# कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक चळवळीतील रयत माऊली सौ.लक्ष्मीबाईचे योगदान

**डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले,**

सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग, चंद्राबाई – शांताप्पा शेंडुरे कॉलेज, हुपरी, जि. कोल्हापूर

..............................................................................................

**प्रस्तावना –**

स्वत:चे सर्व आयुष्य बहुजनांच्यात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी आणि त्यासाठी स्वत:ची सर्व संपत्ती खर्च करणारे पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील ! महाराष्ट्राच्या शैक्षणिक चळवळीतील एक महत्वाचे नाव. खेडयापाडयात रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शिक्षणाची गंगा पोहोचविणाऱ्या आण्णाच्या या कार्यात अनेकांनी हातभार लावला. मात्र सुरुवातीच्या टप्प्यात जेंव्हा आण्णाच्यासमोर पर्यायाने रयत शिक्षण संस्थेसमोर प्रचंड आर्थिक अडचणी होत्या त्या काळात आपले सर्व स्त्रीधन म्हणजेच माहेरकडून मिळालेले सर्व दागिने त्यांच्या ताब्यात देऊन त्यांना आर्थिक टेकू देण्याचे कार्य त्यांच्या पत्नी सौ. लक्ष्मीबाई यांनी केले. सधन माहेर असलेल्या लक्ष्मीबाई सासरी आल्यावरही सोवळे – ओवळे पाळत असत. १९२४ मध्ये रयत शिक्षण संस्थेच्या एका नव्या पर्वाला सुरुवात झाली. सातारा येथे सर्व जातीधर्माच्या मुलांसाठी वसतिगृह सुरू झाले. लक्ष्मीबाईच्या आयुष्यातील हा एक महत्वाचा टप्पा ठरला. कर्मवीराबरोबरच त्यांच्यावरही या वसतिगृहाची जबाबदारी आली. मुलांची काळजी घेणे, त्यांच्या आजारपणात देखभाल करणे, कर्मवीर नसतील तेंव्हा तर सर्वच जबाबदारी त्यांच्यावर येत असे. या सर्व वाटचालीत त्यांचा कर्मठपणा, सोवळ – ओवळ पाळण हे सगळं थांबलं. स्वतच्या मुलांबरोबर त्या वसतिगृहातील मुलांच्याही आई बनल्या. कर्मवीरांच्या कार्यामुळे त्यांचे नातेवाईक त्यांच्याकडे येण्याचे टाळत. अगदी लक्ष्मीबाईच्या गरोदरपणात त्यांची आई फक्त या कारणामुळे आली नाही. ३० मार्च १९३० मध्ये त्यांचा अकाली मृत्यू झाला. लक्ष्मीबाईंनी आपले सर्व आयुष्य त्यांनी कर्मवीरांच्या कार्यासाठी दिले. त्यांच्या असीम त्यागामुळे रयत शिक्षण संस्थेचे कार्य कर्मवीरांना पुढे नेता आले.

महाराष्ट्राच्या जडणघडणीत येथे झालेल्या विविध चळवळींचे महत्वाचे योगदान आहे. या चळवळीं सामाजिक, राजकीय तसेच इतर क्षेत्रात बदल घडवून आणण्यासाठी केलेल्या होत्या. शैक्षणिक क्षेत्रही याला अपवाद नव्हते. महाराष्ट्राच्या दृष्टीने एकोणीसाव्या शतकाचा उत्तरार्ध आणि विसाव्या शतकाचा पूर्वार्ध महत्वाचा ठरला. या काळात प्रचलित किंवा पारंपारीक शिक्षण पद्धतीत बदल होत गेले. शिक्षणाचे सार्वत्रिकरण होऊ लागले. यामध्ये ब्रिटीशांचे योगदान होते त्याचप्रमाणे भारतीयांचेही होते. विशेषत: असे तरुण जे समाजाच्या विकासासाठी बहुजनांच्यात शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे असे मानत होते अशांनी शिक्षण कार्यात झोकून दिले. त्यांच्या कार्यामुळेच शिक्षणाचा बहुजनांच्यात प्रसार झाला. आज शैक्षणिक क्षेत्रात महाराष्ट्र आघाडीवर आहे त्यामागचे हे कारण आहे.

**शोधनिबंधाचा उद्देश –**

एकोणीसाव्या शतकात महाराष्ट्रातील बहुजन स्त्री – पुरुषांसाठी शिक्षणाची कवाडे खुली करण्याचे मोठे धाडस महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी केले. त्यांच्या या कार्याला पुढे नेण्याचे कार्य कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून केले. महाराष्ट्रातील शैक्षणिक चळवळीचा ते एक भाग बनले. रयत शिक्षण संस्थेने महाराष्ट्रातल्या लाखो विद्यार्थ्यांना शिक्षण प्रवाहात आणले. कर्मवीरांनी केलेल्या शैक्षणिक कार्यात त्यांच्या पत्नीचे म्हणजेच सौ. लक्ष्मीबाईंचे मोलाचे योगदान होते. त्यांच्या या योगदानाचा आढावा घेणे हा या शोधनिबंधाचा उद्देश आहे.

**विषय विवेचन –**

**रयत शिक्षण संस्थेची स्थापना – विस्तार**

कोल्हापुरात राहून इंग्रजी सहावीपर्यंत घेतलेले शिक्षण, या काळात राजर्षी शाहू महाराजांशी आलेला संपर्क, मुंबईमध्ये जाऊन जव्हेरी कामाचे शिक्षण घेण्याचा केलेला प्रयत्न, तो सोडून पुन्हा गावाकडे येणे या दरम्यान सौ. लक्ष्मीबाईंशी झालेला विवाह या सर्व घडामोडीनंतर उदरनिर्वाहासाठी कर्मवीर साताऱ्यात आले. तेथे शिकवण्या घेऊन राहू लागले. त्यामध्ये त्यांचा चांगला जम बसला. 'पाटील मास्तर' या नावाने त्यांची नवी ओळख तयार झाली.[१] हळूहळू शिक्षण क्षेत्राकडे ते ओढले जाऊ लागले. मद्वाण्णा गुरुजी, भाऊसाहेब कुदळे, नानासाहेब येडेकर इ. मंडळींच्या बरोबर एकत्र येऊन कर्मवीरांनी १९१०मध्ये दूधगांव शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली. या संस्थेने वसतिगृह सुरू केले. कर्मवीरांच्या शैक्षणिक कार्याची पायाभरणी अशाप्रकारे झाली.[२] एकीकडे कर्मवीरांचे सत्यशोधक चळवळीचे काम जोरदार सुरू होते. ५सप्टेंबर १९१९या दिवशी कराड तालुक्यातील काले गावी सत्यशोधक समाजाची परिषद भरली. यामध्ये रयत शिक्षण संस्थेच्या स्थापनेचा ठराव मांडला गेला. तो एकमताने संमत झाला आणि त्याप्रमाणे ४ ऑक्टोबर १९१९या दिवशी रयत शिक्षण संस्थेची स्थापना झाली. या कार्याची सुरुवात काले या गावापासुन झाली. सर्वप्रथम वसतिगृह सुरू करण्यात आले. याकाळात कर्मवीरांचा मुक्काम किर्लोस्करवाडी येथे होता. वसतिगृहासाठी आसपासच्या गावातून धान्यरूपाने मदत गोळा केली जात होती. त्याबरोबरच कर्मवीर पदरमोडही करत होते. हे वसतिगृह कालांतराने बंद पडले.[३]

१९२४ मध्ये संस्थेचे स्थलांतर काले गावातून सातारा येथे झाले. कर्मवीरांनी यासाठी किर्लोस्कर कंपनीत असलेल्या चांगल्या पगाराच्या नोकरीचा त्याग केला. १९२४ मध्ये सातारा येथे सर्व जातीधर्माच्या मुलांसाठी वसतिगृह सुरू केले. २५ फेब्रुवारी १९२७ मध्ये त्याचे नामकरण महात्मा गांधींच्या हस्ते 'छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस▪ असे करण्यात आले.[४] यानंतर रयत शिक्षण संस्थेचा विस्तार होत गेला. शाळा, महाविद्यालये, वसतिगृहे स्थापन झाली. साताऱ्याबरोबरच इतर जिल्ह्यात विशेषतः खेडयापाडयात रयतच्या शाखा उघडल्या गेल्या. शिक्षणाचा प्रसार हेच कर्मवीरांचे जीवन कार्य बनले. असंख्य लोकांनी धान्य, जमीन, पैसा, निशुल्क सेवा इ. रूपाने रयत शिक्षण संस्थेच्या विस्तारासाठी मदत केली. यामध्ये कर्मवीरांच्या धर्मपत्नी सौ. लक्ष्मीबाई यांनी घरचा संसार सांभाळत कर्मवीरांनी सुरू केलेल्या शैक्षणिक चळवळीस त्यांच्या पद्धतीने योगदान दिले. किंबहुना साताऱ्यातील पहिले वसतिगृह हे त्यांच्यामुळेच स्थिर होऊ शकले असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही.[५]

**लक्ष्मीबाईंचे पूर्वायुष्य थोडक्यात –**

लक्ष्मीबाईंचा जन्म ७ जून १८९४ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव आण्णा पाटील होते. कर्मवीर भाऊरावांचा जन्मही याच गावी त्यांच्या आजोळी झाला. लक्ष्मीबाई व भाऊरावांचे लग्न सन १९०९मध्यें कुंभोज येथे झाले. विवाहपूर्वीचे त्यांचे नाव आदाक्का असे होते. कर्मठ जैन कुटुंबात जन्म झाल्यामुळे सोवळे —ओवळे त्याचप्रमाणे धार्मिक नीती नियम कडकपणे पाळत असत. मितभाषी, सोशीक असलेल्या लक्ष्मीबाईंनी सून म्हणून, नणंद म्हणून त्यांची कर्तव्ये पार पाडली. या दांपत्याला आप्पासाहेब (१९१७), शकुंतला (१९१९), बेबी (१९२६) अशी तीन अपत्ये झाली. कर्मवीरांचे नोकरी, सामाजिक कार्य करणे सुरू होते. त्यांच्या कार्याला त्यांनी विरोध केला नाही. त्यांच्या अनुपस्थितीत त्या घरची सर्व जबाबदारी सांभाळत होत्या. त्यांच्या आयुष्यातील महत्वाचा टप्पा १९२४ नंतर म्हणजेच त्या साताऱ्यात आल्या तेंव्हा सुरू झाला.[६]

**कर्मवीरांच्या शैक्षणिक कार्यात लक्ष्मीबाईंचे योगदान –**

कर्मठ जैन कुटुंबातील मुलगी ते जवळपास तशाच कर्मठ घराची सून ते कर्मवीरांची त्यागी पत्नी असा प्रवास लक्ष्मीबाईंचा झाला. कर्मवीरांच्या आयुष्यातले सर्व चढ उतार त्यांनाही सहन करावे लागले. १९२४मध्ये साताऱ्याचे शाहू बोर्डिंग सुरू झाले आणि लक्ष्मीबाईंच्या आयुष्यातील एका नव्या भूमिकेची सुरुवात झाली. अनेक मुलांच्या आईची भूमिका त्यांनी पार पाडली. साताऱ्यात राहायला आल्यावरही लक्ष्मीबाई सोवळे – ओवळे पाळत असत.[७]

सुरूवातीला विद्यार्थी संख्या कमी होती तेंव्हा लक्ष्मीबाई घरच्याबरोबरच या विद्यार्थ्यांसाठीही स्वयंपाक करत असत. मात्र घरचा स्वयंपाक सोवळ्यात करत. परंतु हळूहळू त्यांनी हे सोवळे पाळणे सोडून दिले. त्यांची मुले आणि वसतिगृहातील मुले एकत्रच वावरत होती. वसतिगृहातील विद्यार्थी त्यांना वहिनी म्हणून हाक मारत असत. हळूहळू वसतिगृहाचा आणि रयत शिक्षण संस्थेचा व्याप वाढत गेला. कामानिमित्त बऱ्याच वेळेला कर्मवीरांना बाहेरगावी जावे लागत असे. अशावेळी वसतिगृहातील मुलांची पुर्णपणे जबाबदारी लक्ष्मीबाईंच्यावर असे. आजारी मुलांची देखभाल, वसतिगृहासाठी काय हवे नको ते बघणे त्यांनाच करावे लागे. यामुळे कर्मवीर आपली बाहेरची कामे अगदी बिनधास्तपणे करत असत.[८]

वसतिगृह सुरू केले तेंव्हा त्याचा खर्च भागविण्यासाठी धान्य – पैसेरूपाने देणगी गोळा करण्याचा प्रयत्न कर्मवीरांनी केला पण हे पुरेसे नव्हते. बराचसा खर्च हा कर्मवीर स्वत: कडील असणाऱ्या पैशातून करत होते. पूर्वी नोकरी करून साठवलेला पैसा त्यांनी वसतिगृहासाठी वापरला. ही रक्कम संपल्यानंतर त्यांनी सौ.लक्ष्मीबाईंचे दागिने गहाण ठेवून पैसे उभा करायला सुरुवात केली. हे गहाण टाकलेले दागिने कधीच परत येत नसत. मंगळसूत्रा व्यतिरिक्त सर्व दागिने गहाण पडले किंवा विकले गेले. एका प्रसंगी विद्यार्थ्यांसाठी जेवण करण्यापुरताही शिधा नव्हता. दुकानदार उधार द्यायला तयार नव्हते. त्यावेळी लक्ष्मीबाईंनी आपले मंगळसूत्रही गहाण ठेवण्यासाठी हॉस्टेलचा सेक्रेटरी अब्दुल गणी यांचेकडे दिले. नेहमीप्रमाणे हा गहाण दागिनाही परत आला नाही.[९] कर्मवीरांनी लक्ष्मीबाईचे दागिने गहाण टाकलेच शिवाय लहान मुलगी शकुंतला हिच्या हातातील आजोळच्या लोकांनी दिलेली सोन्याची कडची त्यांनी वसतिगृहाच्या खर्चासाठी गहाण टाकली. लक्ष्मीबाईंच्या संसाराची अवस्था या गोष्टीमुळे खालावत गेली होती. एकदा भेटायला आलेल्या स्वतच्या भावाला घरी तांदूळ नसल्यामुळे जेवताना भात वाढू शकल्या नाहीत.[१०]

कर्मवीरांच्या सामाजिक कार्याचा फटका लक्ष्मीबाईंना वैयक्तिक आयुष्यात खूप बसला. त्या साताऱ्यात असताना जेंव्हा गरोदर होत्या तेंव्हा त्यांनी त्यांच्या आईला बोलावले. पण त्यांच्या आईने साताऱ्याला येण्याचे टाळले कारण तेथे खालच्या जातीची मुले राहतात. या अवघडलेल्या परिस्थितीत त्या एकटयानेच घरची सर्व कामे करत असत. धाकटी मुलगी बेबी हिचाही आजारपणात मृत्यू झाला. अशा अनेक प्रसंगांना तोंड देत त्यांनी अण्णांचा संसार पुढे रेटला. ३०मार्च १९३०मध्ये बाळंतपणात त्यांचा अकाली मृत्यू झाला.[११]

रयत शिक्षण संस्थेचा सुरुवातीचा कालखंड खूप अडचणीचा होता. या कालखंडात सर्वात मोठा प्रश्न हा आर्थिक म्हणजेच पैशाचा होता. याकाळात लक्ष्मीबाई कर्मवीरांच्या मागे भक्कमपणे उभा राहिल्या. आपले सर्व स्त्रीधन संस्थेचा खर्च चालविण्यासाठी त्यांनी कर्मवीरांना देऊन टाकले. याची जाणीव कर्मवीरांनाही होती. संत गाडगेबाबांच्या उपस्थितीत २७ नोव्हेंबर १९४८ रोजी झालेल्या एका कार्यक्रमाच्यावेळी कर्मवीरांनी आपली भावना बोलून दाखवली. 'मी सर्वांची ऋणे फेडीत आलो मात्र माझ्या पत्नीचे ऋण मला फेडता आले नाही'.[१२] लक्ष्मीबाईच्या जाण्याने त्यांच्या आयुष्यात मोठी पोकळी निर्माण झाली. स्वतच्या दोन मुलांना सांभाळण्यासाठी त्यांना नातेवाईकांकडे ठेवावे लागले.

**निष्कर्ष —**

एक हुड, बेडर, बेफिकीर तरुण ते सामान्यांच्या शिक्षणासाठी अथक झटणारे कर्मवीर असा प्रवास सोपा नव्हता. अनेक बऱ्या—वाईट अनुभवांना सामोरे जाणाऱ्या कर्मवीरांनी एका प्रसंगी आत्महत्येचा प्रयत्न केला पण त्यानंतर मिळालेले आयुष्य त्यांनी जनसामान्यांच्या समाजाच्या उन्नतीसाठी खर्ची घातले. सामान्य गरीब मुलांना शिक्षण मिळावे यासाठी जे काही करता येईल ते त्यांनी केले. प्रसंगी मदतीसाठी त्यांनी समाजाकडे हात पसरले. सुखवस्तू मध्यमवर्गीयांचे आयुष्य जगू शकले असते परंतु अतिव आणि निरंतर कष्टाला त्यांनी जवळ केले ते ही दुसऱ्यांसाठी! शिक्षण कार्याची मुहुर्तमेढ त्यांनी रोवली आणि बघता बघता त्याचे एका मोठया चळवळीत रूपांतर झाले. कर्मवीरांच्या कार्याला अनेकांनी साथ दिली. त्यामध्ये सर्वात महत्वाचे

नाव म्हणजे त्यांच्या पत्नी सौ. लक्ष्मीबाई! लक्ष्मीबाई अल्पायुषी ठरल्या. त्यांचे अकाली निधन झाले. अंतिम क्षणापर्यंत त्या कर्मवीरांप्रमाणेच कार्यरत राहिल्या. एका कर्मठ सुखवस्तू घरातून आलेली मुलगी ते सुरुवातीच्या टप्यात सासू– सासऱ्याच्या संरक्षणाखाली राहिलेली, सर्व सोवळ पाळणारी सून ते कर्मवीरांच्या बरोबर साताऱ्याला आल्याबरोबर वसतिगृहातील अनेक मुलांचे पालकत्व स्वीकारणारी, सर्व परंपरांचा त्याग करणारी वहिनी ही त्यांच्या आयुष्यातील स्थित्यंतरे थक्क करणारी होती. आपल्या सर्व स्त्रीधनाचा अगदी मंगळसूत्राचा त्यागही त्यांनी या मुलांच्या शिक्षणासाठी केला. हे त्यांनी केले नसते तर कर्मवीरांना शैक्षणिक कार्य पुढे नेणे खूप अवघड गेले असते. यामुळे 'रयत माऊली' हे त्यांचे संबोधन अतिशय योग्य आहे असे म्हणावे लागते.

**संदर्भ सूची –**

१ शिंदे आर. के. व इतर, एक महान कर्मयोगी कर्मवीर भाऊराव पाटील, कर्मवीर विद्या प्रबोधिनी सातारा, २२/९/२०१० पृ. १ ते ५

२ चौगुले एस. एस., जैन समाजाचे कर्तबगार दिवंगत नेते, दक्षिण भारत जैन सभा, सांगली , १९८८ पृ. १३३

३ मगदुम विष्णुदास, दृष्टा महात्मा भाऊराव पाटील, हरिश्चंद्र रुक्मिणी धर्मादाय संस्था केनवडे,२०१५ पृ. ४२

४ शिंदे आर. के.उपरोक्त, पृ. ७

५ शिंदे आर.के. व इतर (संपा.), रयत माऊली सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील, कर्मवीर विद्याप्रबोधिनी सातारा, २२/९/२०१०, पृ. ८,९

६ रयत संकुल ब्लॉग स्पॉट डॉट कॉम २४/४/२०१७; कित्ता पृ. ८

७ शिंदे आर.के. व इतर (संपा.), रयत माऊली सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील, उपरोक्त पृ. ९, १०

८ पवार बा. ग.,रयत माऊली सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील समग्र चरित्र ग्रंथ, मातृभूमी प्रकाशन, पुणे, पृ. ६

९ कित्ता

१० शिंदे आर.के. व इतर (संपा.),रयत माऊली सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील, उपरोक्त पृ. ११

११ कित्ता,पृ. ५

१२ कित्ता,पृ.२६